PART-2 (Continue)

# IN THE COURT OF SHRI S. R. TOTLA
# 3RD JOINT CIVIL JUDGE SENIOR DIVISION
# AND ACJM, NAGPUR.
# (ROOM NO.106)

## State V/s. Sunil Kedar & Oth.
## U/s. 406,417,120(B), 34 IPC
## Police Station : Ganeshpeth


## INDEX

| CONTENTS | TOTAL PAGES |
|---|---|
| DEFENCE EVIDENCE | 1 TO 58 |

Pg. 60 . Rs. 420/-

Court of the Chief Judicial Magistrate NAGPUR

# Defence Evidence



(निशानी कमांक : ३२९०)

नि.फौ.खटला क. १४७/२००२
सर. -वि- सुनील केदार व इतर 138

C.A. No. 7301/25

नियमीत फौजदारी खटला क. १४७/२००२
सरकार -वि- सुनील केदार व इतर
निशानी कमांक : ३२९०

(दिनांक :- १६.९.२०२१)

आरोपी (क.८) तर्फे साक्षीदार कमांक १ चे बयान

मी शपथपुर्वक खरे सांगतो की :-

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | सुबोध चांददयाल भंडारी, |
| वय | :- | ५६ वर्षे, |
| व्यवसाय | :- | नोकरी, |
| राहणार | :- | १२०२, हरीयाणा अॅक्रोपॉलीस -२, देवनार पाडा रोड, मुंबई ८८. |

सरतपास आरोपी क.८ तर्फे श्री.बी.बी.तिवारी

१. मी चार्टर्ड अकाउंटंट आहे. मी चार्टर्ड अकाउंटंटची परीक्षा सन १९८९ मध्ये उत्तीर्ण झालो. त्यावेळेस मी कोलकात्याला राहत होतो. मी सी.ए. उत्तीर्ण झाल्यावर कलकत्ता येथे स्टॉक ब्रोकींग कंपनी व्हीसीए मध्ये नोकरी सुरू केली. या कंपनीत मी पाच वर्षे काम केले. त्यानंतर मी लॉएडस् ब्रोकरेज लिमीटेड या कंपनीत नोकरीसाठी अर्ज केला व तेथे मला नोकरी मिळाली. त्याबाबतचे नियुक्तीपत्र माझ्याकडे आहे.

२. (At this stage, the accused sought permission to lead secondary evidence pertaining to the documents filed vide list Exh.3292. The documents were sent to Registry for verification. Document at Sr.No.4 and 5 are photocopies and its originals are not brought by accused. Hence, barring those documents, permission is granted to lead secondary evidence pertaining to rest of the documents. )

Sd/-
16/9/21

३. माझ्या नियुक्तीपत्राची पडताळणी केलेली प्रत प्रकरणात दाखल केलेली आहे. नियुक्तीपत्र मी सोबत आणलेले आहे. सदर नियुक्तीपत्रावर आरोपी क.३ संजय अग्रवाल याची सही आहे. त्याला **निशानी क.३२९३** देण्यात येत आहे.

४. त्यानंतर लॉएड ब्रोकरेज लिमीटेड यांचे नाव बदलून यूरो एशियन सिक्यूरीटीज् असे झाले. त्यानंतर परत सदर कंपनीचे नाव बदलून होम ट्रेड लिमीटेड असे करण्यात आले. सन २००० साली मला होम ट्रेड लिमीटेडचे मुंबई कार्यालयात बदलीवर पाठविण्यात आले. त्याबाबत मला होम ट्रेड लिमीटेडतर्फे माझ्या पगारात झालेल्या बदलांबाबत दि.१.४.२००० रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आले. सदर पत्रावर होम ट्रेड लिमीटेडतर्फे आरोपी क.९ एन.एस.त्रिवेदी याची सही आहे. या पत्राची पडताळणी केलेली प्रत प्रकरणात दाखल केलेली आहे. मूळ पत्र मी सोबत आणलेले आहे. त्याला **निशानी क.३२९४** देण्यात येत आहे.

५. त्यानंतर होम ट्रेड लिमीटेडमध्ये मला बढती देवून सिनीयर व्हाइस प्रेसीडेंट या पदावर नियुक्त करण्यात आले. याबाबत आरोपी क.३ ने सही करून होम ट्रेड लिमीटेडतर्फे मला दि.१.८.२००० रोजी दिलेल्या पत्राची पडताळणी केलेली प्रत प्रकरणात दाखल केलेली आहे. मूळ पत्र मी सोबत आणलेले आहे. त्याला निशानी क.३२९५ देण्यात येत आहे.

६. या पदावर असतांना मी ऑनलाइन शेअर ब्रोकींगचे व्यवहार कंपनीतर्फे बघत होतो. दि.२ जानेवारी, २००१ रोजी कंपनीच्या संचालकांनी ठराव घेवून मला ऑथोराइज्ड सिग्नेटरीचे अधिकार देण्यात आले. त्यानुसार मी कंपनीच्या विविध कागदपत्रांवर ऑथोराइज्ड सिग्नेटरी म्हणून सही करत होतो. सध्या माझ्याकडे त्याबाबत असलेल्या कंपनीच्या ठरावाची केवळ छायाप्रत आहे व ती मी प्रकरणात यादी (नि.३२९२, अनुक्रमांक ४) नुसार दाखल केलेले आहे.

16/9/12

७. त्यानंतर दि. १०.४.२००२ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाने आणखी एक ठराव घेवून हे स्पष्ट केले की मी कंपनीतर्फे ज्या काही दस्तांवर सहया केल्या आहेत, त्याबाबतची कोणतीही वैयक्तीक जबाबदारी माझी नसून ती कंपनी व त्याच्या संचालकांची आहे. कंपनीच्या सदर ठरावाची केवळ छायाप्रत माझ्याकडे आहे व ती मी प्रकरणात यादी (नि ३२९२, अनुकमांक ५) नुसार दाखल केलेले आहे.

८. माझ्याकडे मूळ ठराव नाहीत, परंतु ठरावाच्या सत्यप्रती आहेत. त्या मी आज सोबत आणलेल्या नाहीत.

९. दि. २.४.२००१ पासून मी इंद्रमणी मर्चंटस् लिमीटेडमध्ये संचालक पदावर कार्यरत झालो. ही कंपनी होम ट्रेड लिमीटेडशी संलग्नीत होती व आरोपी क.३ संजय अग्रवाल याने मला इंद्रमणी मर्चंटस् लिमीटेडमध्ये संचालक पदावर कार्य करण्यास प्रस्ताव दिला होता. माझे इंद्रमणी मर्चंटस्मधील सदर नेमणूकीबाबत दोषारोपपत्रासोबत कागदपत्र दाखल केलेले आहेत. मी दि.४.१.२००२ रोजी मी इंद्रमणी मर्चंटस् लिमीटेडमधील संचालक पदाचा राजीनामा दिला. त्याबाबत मी रजिस्ट्रार ऑफ कंपनीज्, कोलकाता यांच्याकडून प्रमाणीत नक्कल उपलब्ध केली आहे. ती माझ्याकडे आहे. त्याची पडताळणी केलेली प्रत प्रकरणात दाखल केली आहे. त्याला **निशानी क.३२९६** देण्यात येत आहे.

१०. दि. २६.४.२००२ रोजी मी होम ट्रेड लिमीटेडमधून राजीनामा दिला. त्याबाबत होम ट्रेड लिमीटेड यांना दिलेल्या पत्राची कार्यालयीन प्रत माझ्याकडे आहे. ती प्रत मिळाल्याबाबत आरोपी क ३ संजय अग्रवाल याने त्यावर सही केलेली आहे. त्याची पडताळणी केलेली प्रत प्रकरणात दाखल केलेली असून त्याला **निशानी क.३२९७** देण्यात येत आहे.

(निशानी कमांक : ३२९०)

उलटतपास अभियोगपक्षातर्फे श्री. ए.एस.कुरेशी, विशेष सरकारी वकील :-

११. हे म्हणणे खरे आहे की आज जे काही कागदपत्र मी दाखल केले आहेत, ते मी तपास सुरू असतांना तपास यंत्रणेला दिले नव्हते. मी होम ट्रेड लिमीटेडमध्ये ऑनलाइन शेअर ब्रोकींग विभागाचा उपाध्यक्ष होतो. होम ट्रेड लिमीटेडमध्ये प्रत्येक विभागात वेगवेगळे उपाध्यक्ष असायचे. माया व्यतिरीक्त या कंपनीत ३ ते ४ उपाध्यक्ष होते. हे म्हणणे खरे आहे की या प्रकरणात माझ्याशी संबंधीत जप्त केलेल्या कॉन्टॅक्ट नोटस् व पत्रांवर माझ्या सहया आहेत.

१२. हे म्हणणे खरे आहे की मी चार्टर्ड अकाउंटंट असून चार्टर्ड अकाउंटंटकडे जे काही कागदपत्र येतात, ते योग्य प्रकारे पडताळणी करून त्यावर सही करण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की या प्रकरणात माझ्याशी संबंधीत दस्तांची योग्य प्रकारे पडताळणी करून मी त्यावर सहया केल्या.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

साक्षदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य करतात.

SD/- 16/9/21
(श.रा.तोतला)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर

दिनांक : १६.०९.२०२१

True Copy
Asstt. Supdt.
C.J.M. Court
Nagpur

| | | |
|---|---|---|
| Copying Charges | ... Rs. | Apr 2 |
| Comparing Charges | ... Rs. | |
| Paper Charges | ... Rs. | |
| Surcharges | ... Rs. | |
| Express Charges | ... Rs. | |
| Total | ... Rs. | 28 |

The date on which copy was applied for 15/12/25
The date on which the application is complete in all respect 23/12/25
The date given to the applicant for taking delivery 23/12/25
The date on which the copy was ready for delivery 29/12/25
The date on which is was delivered 29/12/25

Asst. Supdt./Record Keeper
C.J.M. Court., Nagpur

For Private Use Only

(निशानी कमांक : ३३१२)

नि.फौ.खटला क. १४७/२००२
सर. -वि- सुनील केदार व इतर
Exp. C. A. No. 7801/21

नियमीत फौजदारी खटला क. १४७/२००२
सरकार -वि- सुनील केदार व इतर
निशानी कमांक : ३३१२

(दिनांक :- २२.९.२०२१)

बचावपक्षातर्फे साक्षीदार क.२
आरोपी (क.२) तर्फे साक्षीदार कमांक १ चे बयान

मी शपथपुर्वक खरे सांगतो की :-

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | अशोक नामदेवराव चौधरी, |
| वय | :- | ६७ वर्षे, |
| व्यवसाय | :- | सेवानिवृत्त, |
| राहणार | :- | छत्रपतीनगर, नागपूर |

सरतपास आरोपी क.२ तर्फे श्री.ए.के.भांगडे

१. एप्रिल १९८३ साली मी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक, मुंबई येथे नोकरीला लागलो. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेमध्ये मला परसेवेवर (on deputation) दि.२६.७.१९९३ रोजी नियुक्त करण्यात आले. माझे मूळ नियुक्तीचे पत्र नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेत आहे.

२. मी दि. ११.९.२००० ते २३.९.२००० या कालावधीत माझे वडील व पत्नी यांच्या आजारपणामुळे रजेवर होतो. त्याबाबतचे रजा अर्जाच्या पडताळणी केलेल्या प्रती प्रकरणात दाखल केलेल्या आहेत. दोन्ही अर्जांवर माझ्या सहया असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे (नि.३३१३ व ३३१४) देण्यात येत आहे. त्यानुसार माझी रजा मंजूर झाली होती.

३. मी या प्रकरणात बॅकेतर्फे नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक, होम ट्रेड लिमीटेड, सेंच्यूरी डिलर्स प्रायव्हेट लिमीटेड, इंद्रमणी मर्चटस्

Court of ... Judicial Magistrate ... NAGPUR

22/09/21

प्रायव्हेट लिमीटेड, सिंडीकेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमीटेड व गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमीटेड या कंपन्यांसोबत पत्रव्यवहार केला होता. नाबार्ड व महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक यांच्याकडे मी बॅकेतर्फे आर्थिक विश्लेषक मिळण्याची मागणी केली होती. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सहकारी बॅक व नाबार्ड यांच्यामध्ये देखील पत्रव्यवहार झाला होता. त्या पत्रव्यवहाराच्या प्रती आम्हाला बॅकेत प्राप्त झाल्या होत्या. या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती मी यादी (नि.३३०६) नुसार दाखल केल्या आहेत. तसेच सदर यादीमध्ये संबंधीत पत्रव्यवहाराच्या संबंधाने जप्तीपत्रक (नि.११९५) नुसार, यादी (नि.३३०६) मध्ये साधारणत: दस्त क्र.१३ ते २३ जप्त केल्याचे दिसून येते. परंतु दोषारोपपत्र दाखल करतांना त्यामधील काही दस्त रेकॉर्डवर दाखल केल्याचे दिसून येत नाही किंवा ते नजरचूकीने कुठेतरी दुस-या फाईलला लावले गेले असल्याची शक्यता आहे. त्यापैकी केवळ यादी (नि. ३३०६) मधील अनुक्रमांक २२ वरील दस्त हा याआधीच (नि.१३४८)___नुसार प्रकरणात दाखल करण्यात आल्याचे दिसून येते. सदर पत्रव्यवहार मी नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या सेवेत असतांना झालेला असून त्याबाबत मला माहिती आहे. त्यापैकी ब-याचशा दस्तांवर माझ्या स्वत:च्या सहया आहेत. अशा परिस्थितीत, यादी (नि.३३०६) मधील दस्त क्र.३ ते २१ व २३ बद्दल मला दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात यावी.

(On behalf of accused No.2, the prayer has been made to permit him to lead secondary evidence as stated by him in his above evidence. Heard ld. Counsel for accused No.2. On behalf of prosecution, an application for adjournment has been moved on some personal ground of ld. Spl. Public Prosecutor. The adjournment is sought only for cross-examination and it is made clear on behalf of prosecution that examination-in-chief can be concluded today itself. In view of the same, above prayer of accused no.2 is considered on merits.

It appears that the alleged communications were made

during the tenure of this accused with Nagpur District Central Cooperative Bank. Even in respect of some of the communications, there is mention in the Seizure Memo (Exh.1195). However, either inadvertantly those documents were not produced on record alongwith the chargesheet or the same might have been annexed alongwith some other file out of number of files seized by the Investigation Officer. Only the document at Sr.No.22 in the list (Exh.3306) is appearing on record and it is already marked as Exh.1348. Under such circumstances, the statement made by the accused/witness on oath appears to be sufficient compliance for permission to lead secondary evidence as prayed for. Hence, permission is hereby granted to lead secondary evidence pertaining to document at Sr.No.3 to 21 and 23 in list (Exh.3306)).

४. दि. १८.११.१९९९ रोजीचे पत्र मी नाबार्डचे उपमहाप्रबंधक यांना पाठवून बँकेकरीता आर्थिक विश्लेषक व मार्गदर्शक या पदाच्या नेमणूकीकरीता मार्गदर्शन मिळण्याकरीता पत्र पाठविले होते. त्याची छायाप्रत आता मला दाखविली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर मूळ पत्र नाबार्डकडे व त्याची कार्यालयीन प्रत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे आहे. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३१५ देण्यात येत आहे.)

५. दि. ६.१.२००० रोजीचे पत्र त्यावेळेसचे बँकेचे अध्यक्ष सुनील केदार यांनी नाबार्डचे कार्यकारी संचालक यांना पाठवून बँकेकरीता सहकार विकास निधीमधून आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी पाठविले होते. त्यावर आरोपी क.१ सुनील केदारची सही आहे. माझ्या कार्यकाळात ते बँकेचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांची सही मी ओळखतो. त्याची छायाप्रत आता मला दाखविली. सदर मूळ पत्र नाबार्डकडे व त्याची कार्यालयीन प्रत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे आहे. (दुय्यम

पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३१६ देण्यात येत आहे.)

६. दि. १८.१.२००० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे कार्यकारी संचालक चंद्रशेखरन यांनी नाबार्डचे उपमहाप्रबंधक यांना पत्र पाठवून आमच्या बॅंकेला सहकार विकास निधीमधून आर्थिक विश्लेषकाची नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावावर विचार करण्यात यावा, अशा आशयाचे पत्र दिले होते. सदर पत्राची प्रत आमच्या बॅंकेला पाठविण्यात आली होती. सदर पत्र आमच्या बॅंकेला प्राप्त झाल्याबाबत त्यावर नागपूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे तत्कालीन अधिकारी श्री. नाफडे यांची सही असून ती मी ओळखतो. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३१७ देण्यात येत आहे.)

७. दि. ९.२.२००० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे सीएफए व आयडी कक्षाचे उपसरव्यवस्थापक यांनी नाबार्ड, पुणे यांना पत्र पाठवून आमच्या बॅंकेला सहकार विकास निधीमधून आर्थिक विश्लेषकाची नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावावर निर्णय घेवून तो कळविण्याबाबत पत्र दिले होते. सदर पत्राची प्रत आमच्या बॅंकेला पाठविण्यात आली होती. सदर पत्र आमच्या बॅंकेला प्राप्त झाल्याबाबत त्यावर नागपूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे तत्कालीन अधिकारी श्री. गोडे यांची सही असून ती मी ओळखतो. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३१८ देण्यात येत आहे.)

८. दि. ६.३.२००२ रोजी नाबार्डतर्फे आमच्या बॅंकेला पत्र देवून आम्ही पाठविलेला आर्थिक विश्लेषक नियुक्तीचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे आम्हाला कळविले होते. सदर पत्र आमच्या बॅंकेला प्राप्त झाल्याबाबत त्यावर नागपूर जिल्हा मध्यवर्ती बॅंकेचे तत्कालीन अधिकारी श्री. गोडे यांची सही असून ती मी ओळखतो (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार

(निशानी क्रमांक : ३३१२)

सदर दस्ताला नि.३३१९ देण्यात येत आहे.)

९. दि. १४.३.२००० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेने नाबार्ड, पूणे यांना पत्र लिहून आमच्या बॅंकेच्या आर्थिक विश्लेषकाच्या प्रस्तावावर घेतलेल्या निर्णयाबाबत अवगत करण्यासाठी कळविले होते. या पत्राची प्रत आमच्या बॅंकेत दि.२५.३.२००० रोजी प्राप्त झाली होती. त्याबाबत बॅंकेचा शिक्का व संबंधीत कर्मचारी याची त्यावर सही आहे. तसेच त्यावर सदर पत्र मी अध्यक्षांच्या समक्ष ठेवावे असा शेरा मारून दि. २५.३.२००० रोजी सही केलेली आहे. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी, देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३२० देण्यात येत आहे.)

१०. दि. २२.४.२००० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक यांनी आर्थिक विश्लेषकाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पुन्हा नाबार्डला पत्र पाठवून त्यांनी या प्रस्तावावर घेतलेल्या निर्णयासंबंधाने कळविण्याचीं विनंती केली. सदर पत्रात पूर्वीच्या पत्रांचा संदर्भ देण्यात आला होता, सदर पत्राची प्रत आमच्या बॅंकेला प्राप्त झाली होती. त्यावर सदर पत्र आमच्या बॅंकेचे तत्कालीन व्यवस्थापक गोडे यांनी सदर पत्र बॅंकेचे संबंधीत अधिकारी नाफडे यांच्याकडे रेफर केले आहे. त्यावर श्री. गोडे यांची सही असून ती मी ओळखतो. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३२१ देण्यात येत आहे.)

११. दि. २८.४.२००० रोजीचे पत्र त्यावेळेसचे बॅंकेचे अध्यक्ष सुनील केदार यांनी नाबार्डचे कार्यकारी संचालक यांना पाठवून बॅंकेकरीता आर्थिक विश्लेषकाची पाच वर्षापर्यंत नेमणूक करण्यासाठी विनंती केली आहे. त्यावर आरोपी क्र.१ सुनील केदारची सही आहे. माझ्या कार्यकाळात ते बॅंकेचे अध्यक्ष असल्यामुळे त्यांची सही मी ओळखतो. त्याची छायाप्रत आता मला दाखविली. सदर मूळ पत्र नाबार्डकडे व त्याची कार्यालयीन प्रत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेकडे आहे. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार

सदर दस्ताला नि.३३२२ देण्यात येत आहे.)

१२. दि. २६.४.२००१ रोजी नाबार्डचे उपमहाप्रबंधक यांनी आमच्या बॅकेला पत्र पाठवले व कळविले की बीडीडी स्कीममधून जिल्हा बॅकेला आर्थिक विश्लेषक देता येणार नाही. सदर पत्र आमच्या बॅकेला प्राप्त झाल्यानंतर ते माझ्या समक्ष ठेवण्यात आले होते. त्यावर मी सदर पत्र बॅकेच्या अध्यक्षांसमक्ष ठेवण्याकरीता आदेशीत केले असून त्यावर माझी सही आहे. त्यानंतर सदर पत्र अध्यक्ष आरोपी क.१ सुनील केदार यांच्यासमक्ष ठेवण्यात आले. त्यानुसार त्यांनी त्यावर या संबंधाने असलेल्या संपूर्ण पत्रव्यवहारावर चर्चा करण्यासाठी त्यांच्यासमक्ष ठेवण्याचा आदेश केला. त्यावर आरोपी क.१ सुनील केदार यांची सही असून ती मी ओळखतो. त्यानंतर अध्यक्षांच्या आदेशाची पूर्तता करण्यासाठी मी बॅकेचे अधिकारी नाफडे यांना आदेशीत केले आहे. त्या आदेशावर माझी सही आहे. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्ताला नि.३३२३ देण्यात येत आहे.)

१३. मी बॅकेत सरव्यवस्थापक असतांना सरकारी प्रतिभूती भौतिक स्वरूपात आम्हाला पाठविण्याबाबत वेळोवेळी होम ट्रेड लिमीटेड, सेंच्यूरी डिलर्स प्रायव्हेट लिमीटेड, इंद्रमणी मर्चंटस् प्रायव्हेट लिमीटेड, सिंडीकेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमीटेड व गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमीटेड यांच्यासोबत पत्रव्यवहार केला होता. सदर पत्रव्यवहाराच्या प्रती यादी (नि.३३०६ मध्ये अनु क. १३ ते २२) नुसार दाखल केलेल्या आहेत. हा सर्व पत्रव्यवहार आता मला दाखविला. मूळ पत्र हे संबंधीत कंपन्यांकडे पाठविण्यात आले होते व त्याच्या कार्यालयीन प्रती नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेच्या कार्यालयात आहेत. सदर पत्रांचा उल्लेख जप्तीपत्रक (नि.११९५) मध्ये आहे. या सर्व पत्रांवर मी बॅकेचा महाव्यवस्थापक म्हणून सहया केलेल्या आहेत. यातील मजकूर बरोबर आहे. त्यापैकी अनुक्रमांक २२ वरील पत्राला याआधीच (नि.१३४८) देण्यात आले आहे. त्याव्यतिरीक्त इतर दस्तांना निशानी देण्यात यावी ही विनंती. (दुय्यम पुरावा

(निशानी कमांक : ३३१२)

देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्तांना अनुक्रमे नि. ३३२४ ते ३३३२ देण्यात येत आहे.)

१४. दि. १९.४.२००२ रोजी आम्ही बॅंकेतर्फे नाबार्डच्या निरीक्षणादरम्यान अंडरटेकींग दिले होते. सदर अंडरटेकींगवर माझी स्वत:ची, आरोपी क.११ पेशकर यांची व हिशेबनीस श्री.वखरे यांची सही आहे. त्यानुसार आम्ही नाबार्डला कळविले की कोणत्याही सरकारी प्रतिभूतींची मूळ प्रमाणपत्रे बॅंकेला प्राप्त झालेली नाहीत. तसेच बॅंकेने कोणत्याही सरकारी रोख्यांची मूळ प्रमाणपत्रे होम ट्रेड लिमीटेडकडे परत पाठविली नाहीत. सदर मूळ अंडरटेकींग नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेत आहे. सदर अंडरटेकींगची प्रत मला सहकार अधिनियमाचे कलम ८८ नुसार सुरू झालेल्या चौकशीदरम्यान देण्यात आली होती. (दुय्यम पुरावा देण्याची परवानगी देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदर दस्तांना अनुकमे नि.३३३३ देण्यात येत आहे.)

**(सरतपास पूर्ण.)**

**(मध्यान्हाची वेळ झाल्यामुळे उलटतपास मध्यान्हवेळेनंतरपर्यंत तहकूब.)**

(शे.रा.तोतला)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर

दिनांक : २२.०९.२०२१

**उलटतपास अर्ज (नि.३३३४) नुसार आरोपी क.४ तर्फे ॲड. श्री.पुरोहीत :-**

१५. मी आज रोजी मला जे काही कागदपत्र मिळाले, ते माझ्या विभागीय चौकशी मिळाल्याबाबत किंवा इतर कोणत्याही चौकशीत किंवा इतर कोठूनही मिळाल्याबाबत, मी कोणताही पुरावा प्रकरणात दाखल केलेला नाही.

१६. हे मला आठवत नाही की मी जे काही कागदपत्र दाखल केले त्यापैकी कोणतेही कागदपत्र दोषारोपपत्रासोबत दाखल करण्यात आलेले नाहीत. मी दाखल केलेले पत्र (नि.३३२६ व नि.३३३१) मध्ये नमूद केलेल्या व्यवहाराबाबतची रक्कम गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेस लिमीटेड यांना अदा करण्यात आल्याबाबत

कोणताही पुरावा प्रकरणात दाखल आहे किंवा नाही ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की आजरोजी मी जे काही कागदपत्र दाखल केले त्यासोबत सदर कंपनीला या पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे रक्कम अदा केल्याचे पुरावे मी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की पत्र (नि.३३३१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कोणताही व्यवहार प्रत्यक्षात पूर्णत्वास गेला नव्हता, त्यामुळे बँकेने अशी कोणतीही रक्कम गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेस लिमीटेड यांना दिलेली नव्हती.

१७. हे मला माहित नाही की गिल्टेज मॅनेजमेंटसोबत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला ११.२२ कोटी रूपयाचा व्यवहार दि. ७.१.२००२ रोजी झाला होता व दि. ९.१.२००२ रोजी सदर व्यवहाराची रक्कम होम ट्रेड लिमीटेड मार्फत नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेला परत करण्यात आली होती. हे मला माहित नाही की दि. १०.१.२००२ नंतर नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचा गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेस लिमीटेडशी शासकीय प्रतिभूतीच्या खरेदीविक्रीचा कोणताही व्यवहार झाला नव्हता.

१८. या प्रकरणात पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. सदर बयान नोंदवितेवेळी मी पोलीसांना दस्त यादी (नि.३३०६) नुसार दाखल केलेले कोणतेही कागदपत्र तपासी अधिका-याला दिले नव्हते. तपासादरम्यान या संबंधाने मूळ कागदपत्र कोठे आहेत हे मला माहित होते. सदर कागदपत्र नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेकडे होते. हे म्हणणे खरे आहे की दस्त (नि.३३२६ व ३३३१) हे गिल्टेज मॅनेजमेंट सर्विसेसला प्राप्त झाले होते याबाबत कोणताही पुरावा मी प्रकरणात दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या संबंधाने मी जे काही कागदपत्र दाखल केले आहेत, त्यावर संबंधीत बॅंक अधिकारी किंवा संबंधीत कार्यालयाने त्या सत्यप्रती असल्याचे प्रमाणीत करून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत:ला वाचविण्यासाठी हे सर्व बनावट कागदपत्र प्रकरणात दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की दस्त (नि.३३३३) हा बनावट दस्त असून

असे कोणतेही अंडरटेकींग कोणत्याही तपास यंत्रणेने आमच्याकडून घेतले नव्हते व त्यामुळेच ते कोणाला उद्देशून लिहीले आहे याबाबत त्यावर काहीही नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी क्र.५ व ६ तर्फे ॲड. श्री.अग्रवाल :-**

१९. हे म्हणणे खरे आहे की दस्त (नि.३३३० व ३३३२) मी अनुक्रमे सेंच्यूरी डिलर्स प्रायव्हेट लिमीटेड व इंद्रमणी मर्चंटस् प्रायव्हेट लिमीटेड यांना कशाप्रकारे पाठविले याबाबत माझ्या सरतपासात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की सदर दस्त संबंधीत कंपन्यांना प्राप्त झाले होते याबाबत कोणताही दस्त मी प्रकरणात लावलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की नाबार्ड, महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंक व नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या संबंधाने मी जे काही कागदपत्र दाखल केले आहेत, त्यावर संबंधीत बॅंक अधिकारी किंवा संबंधीत कार्यालयाने त्या सत्यप्रती असल्याचे प्रमाणीत करून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की केवळ माझा स्वत:चा बचाव करण्यासाठी मी खोटे दस्त दाखल केले असून असे कोणतेही दस्त प्रत्यक्षात अस्तित्वात नाहीत. हे म्हणणे खरे नाही की दस्त (नि.३३३३) हा बनावट दस्त असून असे कोणतेही अंडरटेकींग कोणत्याही तपास यंत्रणेने आमच्याकडून घेतले नव्हते व त्यामुळेच ते कोणाला उद्देशून लिहीले आहे याबाबत त्यावर काहीही नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**(उलटतपास अभियोगपक्षातर्फे श्री. ए.एस.कुरेशी, विशेष सरकारी वकील यांच्यातर्फे अर्ज (नि.३३११) वरील आदेशानुसार दि. २३.९.२०२१ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.)**

२२।०९।२१

(शे.रा.तोतला)
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर

दिनांक : २२.०९.२०२१

(15)



(निशानी कमांक : ३३१२)

उलटतपास शपथेवर सुरू :-

उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सरकारी वकील श्री. ए.एस.कुरेशी :-

२०. माझा पोलीस कोठडी रिमांड हा साधारण १० ते १२ दिवसांसाठी झाला होता. त्यानंतर मला एम.सी.आर. मध्ये घेण्यात आले. माझे पीसीआर किंवा एमसीआर च्या काळात मी माझ्या पुराव्यादरम्यान दाखल केलेले कागदपत्र तपासी यंत्रणेला दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की मी आजरोजी जे काही कागदपत्र दाखल केले ते सर्व खोटे आहेत. हे म्हणणे खरे नाही की मी स्वत:ला वाचविण्यासाठी खोटे कागदपत्र दाखल केले आहेत व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला. फेरतपास नाही.

साक्षदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य करतात.

(शे.रा.तोतला) 23/9/21
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर

दिनांक : २३.०९.२०२१

Judicial ... सत्यमेव जयते NAGPUR

True Copy
9/12/25
Asstt. Supdt.
C.J.M. Court
Nagpur

| | | |
|---|---|---|
| Copying Charges | ... Rs. | 10 pages |
| Comparing Charges | ... Rs. | |
| Paper Charges | ... Rs. | |
| Surcharges | ... Rs. | |
| Express Charges | ... Rs. | |
| Total | ... Rs. | 40/- |

The date on which copy applied for 15/12/25
The date on which the application is completed in all respect 23/12/25
The date given to the applicant for taking delivery 23/12/25
The date on which the copy was ready for delivery 29/12/25
The date on which is was delivered 29/12/25

Asst. Supdt./Record Keeper
C.J.M. Court., Nagpur

IN THE COURT OF THE LD ADDL CHIEF JUDICIAL MAGISTRATE, AT: NAGPUR

(A) 1388 15

For Private Use Only R.C.C Case No 147/2022

Exh. - 329

Exd. C.A. No. 7300/12

The State ——— Complainant

The date on which copy applied for......15/12/25 the date on which the application is completed in all respect...23/12/25 the date given to the applicant for taking delivery.23/12/25 the date on which the copy was ready for delivery...29/12/25 the date on which is was delivered ...........29/12/25

Asst. Supdt./Record Keeper C.J.M. Court., Nagpur

V/S

Subodh. C. Bhandari ——— Accused 8

Application to permit list of defence witness document to defence

The documents are sought to be produced in support of defence, hence production thereof is hereby allowed

Sd/- 16/9/21

MAY IT PLEASE YOUR HONOUR

On behalf of the accused above named it is submitted as under

That the accused No. 8 shall be examining himself in defence u/s 315 and shall produce following documents for exhibits on the record.

Hence it is requested to kindly permit him to do the same.

List of Document is Annexed

Sd/-

Advocate for the Accused No. 8

True Copy
Sd/- 29/12/25
Asstt. Supdt.
C.J.M. Court
Nagpur

Charges ... Rs. ....................
Charges ... Rs. ....69.04....
Charges ... Rs. ....................
Surcharges ... Rs. ....................
Express Charges ... Rs. ....................
Total ... Rs.